# तुंबलेल्या ड्रेनेजची मैला थेट घरात!

## पालिका अधिकारी विसरले इथे माणसे राहतात

सोलापूर/दीपक शिराळकर

ड्रेनेजचा मैला थेट घरात येतोय. त्याची दुर्गंधी जगणं असह्य करतेय. पण ,या झोपड्यांत माणसे राहतात, आणि त्यांना जगण्याचा अधिकार आहे, याचा विसर महापालिका अधिकाऱ्यांना पडला आहे. जिवनावश्यक कामांना निवडणूक आचारसंहितेचा अडसर नसतो, याची कल्पना नागरिकांना नाही. त्यामुळे महापालिका अधिकाऱ्यांचे फावले असून देशमुख पाटील वस्ती आणि आमराई भागात कधीही साथीचे आजार पसरून बळी जाऊ शकतात, अशी गंभीर परिस्थिती आहे.

देशमुख पाटील वस्तीत जवळपास १० ते १५ ड्रेनेज चेंबर्स तुंबली आहेत. त्यातून मैला बाहेर येत आहे. ती जवळच्या झोपडपट्टीत राहणाऱ्या नागरिकांच्या घरात शिरत आहे. मुळात झोपडीचा आकार लहान. त्यामुळे अशा घाणीतच त्यांना खाणे पिणे करावे लागते. गेले दोन महिने हा त्रास सुरू असून अनेक लोक ताप, हागवण अशा आजारांना सामोरे जात आहेत.



पालिका अधिकाऱ्यांकडे याची तक्रार स्थानिक नागरिकांनी अनेकदा केली आहे. मात्र आचारसंहिता आहे, आता कोणते काम करता येत नाही, असे बिनदिक्कत खोटे उत्तर पलिका अधिकारी देत आहेत.

त्यामुळे तीन हजार वस्तीच्या लोकसंख्येचे आयुष्यच धोक्यात आले आहे. तर घरात मैला शिरणाऱ्या २५ - ३० घरातील नगरिक आत्महत्या करण्याच्या मन:स्थितीत येण्याएवढे निराश झाले आहेत.

### अशी ही कराणांची मालिका

येथील नागरिक गेली दोन महिन्यापासून महापालिका अधिकाऱ्याशी मोबाईलच्या माध्यमातून संवाद साधण्याच्या प्रयत्नांत आहे. झोन क्र. ६ चे अधिकारी कॉल स्वीकारत नाहीत. कॉल स्वीकारला तरी आमचे अमुक वारले, मयतमध्ये आहे, गाडी नाही, निवडणूक ड्युटीमध्ये आहे.आचारसंहिता असल्ने काम करता येत नाही. अशी कारणांची मालिका महापालिकेचे अधिकारी देत असल्याची स्थानिकांची तक्रार आहे.

### आंदोलनाच्या पवित्र्यात नागरिक

महापालिका प्रशासनाने ड्रेनेजची तात्काळ दुरुस्ती करून द्यावी. अन्यथा महापालिकेसमोर तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा या परिसतील नागरिकांनी दिला आहे.

### डासांचा उपद्रव वाढला

या ड्रेनेजच्या पाण्यामुळे परिसरात दुर्गंधी पसरली आहे. डासांचे साम्राज्य निर्माण झाले आहे. डेंग्यू मलेरियाचे रुग्ण आढळू लागले असल्याचे बोलले जात आहे. त्याच घाणीतून लहान मुले खेळत असतात. पालिका अधिकारी आमच्या मरणाची वाट पहात आहेत का? असा संतप्त सवाल केला जात आहे.



देशमुख – पाटील वस्ती परिसरात गेल्या दोन महिन्यापासून ड्रेनेज लाईन तुंबून गेली असून घरात, अंगणात ड्रेनेज मधले घाण पाणी शिरत आहे. यामुळे आमच्या परिवाराचे आरोग्य धोक्यात आले आहे. या दुर्गंधीमुळे कुटूंब आजारी पडत आहेत. महापालिकेने लवकर काम पूर्ण करावे.

– सुगंधा चंद्रकांत अवचारे
(परिसरातील नागरिक)



या दुर्गंधीमुळे आमचा जीव वैतागून गेला आहे. आमचे हातावरचे पोट असून दिवसभर काम करून येतो. भूक, ताण, झोप या दुर्गंधीमुळे गेली. दोन महिन्यापासून संपर्क साधते अधिकारी म्हणतात, उद्या करू, परवा करू जेटिंग मशीन बंद आहे, असे कारण देतात आणि डायरेक्ट फोन ठेवतात.

– पूजा विशाल कांबळे
(परिसरातील नागरिक)

---

## भाळवणी तांदुळवाडी ब्रँचवरील शेतकरी आक्रमक

नीरा उजवा कालव्याचे पाणी न मिळाल्याने पिके संकटात



वेळापूर : आठ मार्च रोजी सुरू झालेले उन्हाळी हंगाम आवर्तन आज तागायत शाखा क्र.२ भाळवणी, तांदुळवाडी वरील गावांना मिळाले नाही. उभी पिके जळू लागल्याने त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांनी आक्रमक पवित्रा घेतला आहे.पाण्याअभावी शेतातली उभी पिके जळून खाक झाली आहेत. जनावरांच्या चाऱ्याचा, पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. त्यामुळे भागातील शेतकऱ्यांनी निरा कालव्यावर जाऊन पाणी वाढवून निषेध व्यक्त केला. गुरुवारी (दि.२) दुपारी दोन वाजल्यापासून शेकडो शेतकरी फळवणी येथील निरा कालवा भाळवणी ब्रँच फाट्यावर उन्हात बसून होते. अधिकाऱ्यांनी १२ एप्रिल रोजी पूर्ण क्षमतेने पाणी देण्याचे मान्य केले होते,परंतु आजतागायात ते मिळाले नाही. नीरा कालव्याचे माचणूर उपअभियंतांनी भाळवणी फाटा येथे शेतकऱ्यांच्या मागणीनुसार या फाट्याचे पाणी वाढवून द्यावे अशी मागणी केली पण संबंधित निरा कालव्याचे उपअभियंता फाट्यावर आले नाहीत. परिणामी आक्रमक झालेल्या शेतकऱ्यांनी फाटा उचलून पाणी वाढवून घेतले.

---

# कोणत्याही स्थितीत संविधान बदलले जाणार नाही

## भाजपचे माजी खा. अमर साबळे यांचे स्पष्टीकरण

सोलापूर/प्रतिनिधी

भारतीय संविधान हा सर्वश्रेष्ठ असा राष्ट्रग्रंथ आहे. मोदी सरकारचा कारभार मनुस्मृतीवर नव्हे तर संविधान रुपी भीमस्मृतीवर चालतो असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी वेळोवेळी सांगितले आहे. कोणत्याही स्थितीत संविधान बदलले जाणार नाही मात्र काँग्रेसकडे कोणतेही विकासाचे मुद्दे नसल्याने संविधान बदलणार असल्याचा भ्रम निर्माण करण्यात येत असल्याचा आरोप भाजपचे माजी खा. अमर साबळे यांनी केला आहे.

तिसऱ्या वेळेस भाजपच्या हाती सत्ता दिल्यास देशाचे संविधान बदलण्यात येणार असल्याची अफवा, भीती व भ्रम निर्माण करण्याचे काम काँग्रेसकडून केले जात आहे. यासंदर्भात खुलासा करण्यासाठी भाजपचे लोकसभा विभाग समन्वयक माजी खा. अमर साबळे यांनी आज सोलापुरात पत्रकार परिषद घेऊन खुलासा केला.



खा. अमर साबळे पुढे म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दोन वर्ष १८ महिने ११ दिवस या कालावधीत देशाचे संविधान निर्माण केले. आम्ही भारताचे लोक हे संविधान स्वत:प्रत अर्पण करीत आहोत असे प्रस्तावनेत स्पष्ट केले आहे. या देशातील लोकच संविधानाचा केंद्रबिंदू आहे मात्र हे संविधान बदलल जाणार आहे असा आरोप काँग्रेस आणि मित्रपक्ष हे करत आहेत. या संदर्भात विरोधकांकडून भ्रम निर्माण केला जात आहे. परंतु डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी निर्माण केलेल्या संविधानाचा मूलभूत ढाचा बदलता येत नाही. त्यात दुरुस्ती करता येत नाही असा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने दिला आहे. तरीही संविधान बदलणार असल्याचा बिन बुडाचा आरोप, भीती, गैरसमज काँग्रेस आणि मित्र पक्षाकडून केला जातो. त्याला काहीही अर्थ नाही. मोदी सरकारचा कारभार मनुस्मृतीवर नव्हे तर संविधान रुपी भिमस्मृतीवर चालतो असे यापूर्वीच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी स्पष्ट केले आहे. संविधान बदलले जाणार नाही अशी ग्वाही पंतप्रधान मोदी यांनी वेळोवेळी दिली आहे , असेही अमर साबळे यांनी यावेळी स्पष्ट केले. या पत्रकार परिषदेस राजा माने यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

---

## जातीवाचक शिवीगाळ केल्याच्या आरोपातून महिलेसह चौघे दोषमुक्त

सोलापूर/प्रतिनिधी

जागेतील वहिवाटीच्या कारणावरून मिळकतदारास जातीवाचक शिवीगाळ तसेच मारहाण केल्याच्या आरोपातून रामलिंगप्पा उर्फ बाळू चिंचोळकर, रमेश चिंचोळकर, शंतनू चिंचोळकर आणि हेमलता राजेंद्र चिंचोळकर (सर्व रा.विजापूर रोड, सोलापूर) यांना गुन्हा शाबित न झाल्याने निर्दोष मुक्त करण्याचा आदेश अतिरिक्त सत्र न्यायाधीश एस.आर.शिंदे यांनी नुकताच दिला आहे.

ही घटना २६ एप्रिल २०१९ रोजी नवीन सर्वे नं. ३०/९ या ठिकाणी घडली होती. याप्रकरणी विजापूर नाका पोलिसांनी चौघांविरुद्ध अट्रॉसिटी आणि मारहाणीचा गुन्हा दाखल करून आरोपपत्र न्यायालयात दाखल केले होते. या खटल्यात सरकारतर्फे ४ साक्षीदार तपासण्यात आले. आरोपींच्या वकिलांनी मांडलेला युक्तिवाद ग्राह्य धरून न्यायालयाने सर्व आरोपींना दोषमुक्त ठरविले .खटल्यात आरोपीतर्फे ॲड. शशी कुलकर्णी, ॲड.पारेख, ॲड. गुरुदत्त बोरगावकर,ॲड. रणजीत चौधरी, ॲड.प्रसाद अग्निहोत्री, ॲड.प्रणव उपाध्ये तर सरकारतर्फे ॲड.दत्ता पवार यांनी काम पाहिले.

---

## संक्षिप्त वृत्त

### चैतन्य हास्य क्लबतर्फे सांगोला मुख्याधिकाऱ्यांना निवेदन

सांगोला : सांगोला शहरात गेली वीस वर्षाहून अधिक काळ चैतन्य हास्य क्लब डॉ.बाबासाहेब आंबेडकर उद्यान, राणौजीबुवा मंदिरात दररोज सकाळी सहा ते साडे सात या वेळेत अखंड सुरु आहे. शेजारी डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्याचे नुतनीकरणाचे काम सुरु आहे. भविष्यात ज्येष्ठ नागरिकांना जागेची गैरसोय होवू नये यासाठी नगरपालिकेने सांगोला शहरात मध्यवर्ती ठिकाणी जागा उपलब्ध करुन द्यावी व नगरपालिकेसाठी मिळणाऱ्या निधीतून ज्येष्ठ नागरिकांना शेड मारुन जागा उपलब्ध करुन द्यावी अशा मागणीचे निवेदन मुख्याधिकारी डॉ.सुधीर गवळी यांना दिले. १ मे रोजी ध्वजारोहण कार्यक्रम झाल्यानंतर अध्यक्ष जगताप, सचिव भागवत पैलवान, झिरपे, बाळासाहेब तेली, अशोक केदार, प्रा. उत्तम घाटुळे, उत्तम पाटोळे, प्रा.राजा ठोंबरे, हेमंत तेली, जयंत तेली, डॉ.कृष्णा इंगोले, अरविंद डोंबे, अशोक जाधव आदी उपस्थित होते.



### शाळेपासून कलेक्टर होण्याची जिद्द बाळगा : डॉ. काठोळे

दक्षिण सोलापूर :- प्रशासकीय अधिकारी होण्याची जिद्द शालेय जीवनापासूनच बाळगावी, असा सल्ला डॉ. पंजाबराव देशमुख आयएएस अकॅडमी, अमरावतीचे संचालक प्रा. डॉ. नरेशचंद्र काठोळे यांनी दिला. यूपीएससी परीक्षेची तयारी कशी करावी यासाठी कै. ब. ई. चनशेट्टी गुरुजी प्रतिष्ठान संचलित ग्लोबल व्हिलेज पब्लिक स्कूल अँड ज्युनिअर कॉलेज, बोरामणी येथे 'आयएएस ज्युनिअर' या कार्यक्रमाचे आयोजन केले होत. त्याप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. उमाकांत चनशेट्टी होते. याप्रसंगी व्यासपीठावर प्रा. डॉ. मोहन खडसे, संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. अनिकेत चनशेट्टी, प्राचार्या आसमा नदाफ व स्पर्धा परीक्षा केंद्राच्या समन्वयीका कल्याणी आदटराव उपस्थित होते. संस्थेचे संस्थापक प्राचार्य उमाकांत चनशेट्टी यांनी अध्यक्षीय स्थानावरून बोलताना उत्तर प्रदेश आणि बिहार ही कमी प्रगत असलेली राज्य असूनही यूपीएससीमध्ये टक्केवारी जास्त आहे तर महाराष्ट्राची टक्केवारी त्यामानाने फार कमी आहे अशी खंत व्यक्त केली.

कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलनाने करण्यात आली. पाहुण्यांचे स्वागत सानिका जगताप या विद्यार्थिनीने केले. यावेळी महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर पाहुण्यांचा सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कल्याणी आदटराव यांनी केले. आभारप्रदर्शन संगीता कोनापुरे यांनी केले. याप्रसंगी वैजनाथ हतुरे, डॉ. अजय निनावे, कुलकर्णी, कमलाकर भोसले, अरुण शिंदे, आप्पासाहेब घुगले, अमृता कोरीशेट्टी, सोनाली मुदकन्ना, प्रिया बिराजदार, संगीता कोनापुरे, पौर्णिमा सरवदे, महानंदा दहिटणे, के.नागसुंदरी यांच्यासह पालक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

---

# मतदान केंद्रावर जिल्हाधिकाऱ्यांकडून स्वच्छता

जिल्हा परिषदेचे संदीप कोहिनकरांसह अन्य कर्मचारी सहभागी

सोलापूर/प्रतिनिधी

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद आणि जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर यांच्यासह संबंधित कार्यालयातील कर्मचाऱ्यांनी मतदार केंद्रावर स्वतः झाडू मारून स्वच्छता मोहीम राबविली.

निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार सोलापूर व माढा लोकसभा मतदारसंघासाठी७ मे रोजी मतदान होणार आहे. जास्तीत जास्त मतदान करण्यासाठी प्रशासनाच्यावतीने विशेष प्रयत्न केले जात आहेत. त्याच अनुषंगाने जिल्ह्यातील ३ हजार ६१७ मतदान केंद्रावर स्वच्छता मोहीम राबवून त्या ठिकाणी आवश्यक त्या सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. ग्रामीण भागातील २ हजार ३६१ मतदान केंद्रापैकी दक्षिण सोलापूर तालुक्यातील बोरामणी येथील मतदान केंद्रावर जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी मतदान केंद्राच्या परिसरात स्वतः झाडू हाती घेऊन केंद्र परिसरात स्वच्छता मोहिमेचा आरंभ केला.

नगरपालिका स्तरावरील ४८४ मतदान केंद्रावरही गुरूवारपासून स्वच्छता मोहीम सुरू झाली आहे. महापालिका स्तरावरील ७७२ केंद्रावर स्वच्छता मोहीम लवकरच सुरू होत आहे. यावेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, दक्षिण सोलापूरचे गटविकास अधिकारी बाळासाहेब वाघ यांच्यासह बोरामणी येथील ग्रामस्तरीय कर्मचारी उपस्थित होते.

मागील लोकसभा निवडणुकीत सोलापूर जिल्ह्यात सरासरी मतदान ६१ टक्के झाले होते. यंदा किमान ७० टक्केपर्यंत मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी जिल्हा प्रशासनाच्यावतीने विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. त्याच अनुषंगाने जिल्ह्यातील सर्व मतदान केंद्रावर मतदारांसाठी अनेक सोयी सुविधा उपलब्ध करून दिल्याचे जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी सांगितले. वाढते तापमान पाहता सावलीसाठी प्रत्येक मतदान केंद्रावर मंडप उभारणार आहे. मतदान केंद्रावर पिण्याच्या पाण्याबरोबरच ओआरएस चे पाणीही उपलब्ध करून देणार आहे. मतदान केंद्र परिसराची स्वच्छता मोहीम सुरू केली असून प्रत्येक मतदान केंद्र व परिसर अत्यंत स्वच्छ ठेवण्यात येणार आहे. ही मोहीम ६ मे पर्यंत राबविण्यात येत आहे. मतदान केंद्र व परिसरात स्वच्छता राहिल्याने मतदारांना मतदान करण्यासाठी उत्साह राहील. मतदान केंद्रावर मोठ्या रांगा लागल्यास मतदारांना बसता यावे यासाठी तेथे बेंचेस व खुर्चीची व्यवस्था करणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशीर्वाद यांनी दिली.

---

# मुस्लिम समाजाने पुन्हा तीच चूक करु नये : ॲड. आंबेडकर

## सोलापुरात पुरस्कृत उमेदवारीसाठी सभा ▶▶ काँग्रेससह भाजपावर सडकून टीका

सोलापूर/प्रतिनिधी

गेल्या लोकसभा निवडणुकीत सोलापुरात मुस्लिम समाजाचे अडीच लाख मतदान काँग्रेसला झाले होते. तेच मतदान जर वंचित बहुजन आघाडीला झाले असते तर वंचित बहुजन आघाडी विजयी झाली असती. तेव्हा मुसलमानांनी आता विचार करण्याची वेळ आली आहे. भाजपला हरवायचे की विजयी करायचे हे आता मुसलमानांनी ठरवले पाहिजे. वंचितला मतदान केल्यास भाजपा पराभूत होईल, असे प्रतिपादन वंचितचे सर्वेसर्वा ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

सोलापूर लोकसभा मतदारसंघाचे वंचित बहुजन आघाडी पुरस्कृत उमेदवार अतिश बनसोडे यांच्या प्रचारार्थ जय भवानी शाळा मैदानावर आयोजित सभेत ॲड. आंबेडकर बोलत होते. यावेळी विचार मंचावर सोलापूर जिल्हा प्रभारी प्रा. सोमनाथ साळुंखे, पुरस्कृत उमेदवार अतिश बनसोडे, जिल्हाध्यक्ष चंद्रशेखर मडीखांबे, युवक अध्यक्ष पांडुरंग खांडेकर, मल्लप्पा शिंदे, कामगार संघटनेचे अध्यक्ष ज्योतिर्लिंग स्वामी, अनिल जाधव, क्रांतीताई सावंत, साळुंखे विलास पोटफोडे ,मुस्लिम आघाडीचे पदाधिकारी उपस्थित होते.




### राहुल गायकवाड यांच्याविषयी ब्र शब्दही नाही

सोलापूरमधील वंचितने जाहीर केलेले उमेदवार राहुल गायकवाड यांनी अचानक वरिष्ठांना न कळवता उमेदवारी अर्ज काढून घेतला. त्यानंतर त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. याबद्दल ॲड. आंबेडकर यांनी सभेमध्ये ब्र शब्दही काढला नाही. एवढी मोठी घटना होऊनही ॲड. आंबेडकर त्याबद्दल का बोलले नाही, याची चर्चा सभास्थळी होती.

आपल्या भाषणात ॲड. आंबेडकर यांनी काँग्रेस आणि भाजपावर जोरदार हल्ला चढविला. बोफोर्स प्रकरणी काँग्रेसचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांच्यावर पुरावा नसतानाही आरोप झाले मात्र सध्या भाजपच्या कार्यकाळात अनेक प्रकरणाचे पुरावे असतानाही काँग्रेसवाले कुठल्या बिळात बसले आहेत. काँग्रेसमध्ये भाजपला अंगावर घेण्याची हिंमत नाही. काँग्रेस वाल्याचे तोंड कोणत्या मशीनने शिवले आहे ? ते तरी सांगा असा सवाल ॲड. आंबेडकर यांनी उपस्थित केला. काँग्रेसवाल्यांनी भाजपासोबत छुपा समझोता केला आहे. त्यामध्ये वंचित बहुजन आघाडीचा बळी देण्याचा प्रयत्न होत असल्याचा खळबळ जनक आरोप यावेळी ॲड. आंबेडकर यांनी केला आहे.

### वंचितला मतदान केल्यास भाजपा पराभूत होईल

सन २०१९ मध्ये झालेल्या सोलापूर लोकसभा मतदारसंघातील निवडणुकी संदर्भात बोलताना आंबेडकर म्हणाले, मागील वेळी मुसलमानांनी केलेली चूक पुन्हा करू नये. समाजातील मौलवींनी आता यापुढे ओबीसी, धनगर, भटके विमुक्त यांच्याशीही संपर्क साधणे गरजेचे आहे. त्यांची भूमिका जाणून घेणे आवश्यक आहे. काँग्रेसच्या पलीकडे जाऊन आता आपली भूमिका त्यांनी ठरवावी लागेल. मागील निवडणुकीतील काँग्रेसच्या मतात वाढ होणार नाही. तिथे चिटकून राहाल तर भाजपाला निवडून आणल्याशिवाय राहणार नाहीत. भाजपला हरवायचं की विजयी करायचं हे आता मुसलमानांनी ठरवलं पाहिजे. दुसरीकडे वंचितला मतदान केल्यास भाजपा पराभूत होईल. हे लक्षात ठेवले पाहिजे.

महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

**'ई' निविदा सूचना**

मान्यताप्राप्त अनुभवी कंत्राटदारांकडून खालील कामाकरिता निविदा मागवण्यात येत आहेत. इतर सर्व निविदा माहिती https://tender.mahadiscom.in/eatApp या वेबसाईटवर उपलब्ध आहे. निम्नस्वाक्षरीधारकांकडे कोणतेही कारण न देता निविदा रद्द करणेबाबत अधिकार राखून ठेवले आहेत.

| अ. क्र. | निविदा क्रमांक | कामाचे स्वरूप | निविदा रक्कम | अंतिम तारीख |
|---|---|---|---|---|
| ०१ | EE/PPR/T-01/2024-25 | RSJ/PSC पोल, वितरण रोहित्र, मिटर्स, ऑईल बॅरल वाहतूक व इतर साहित्याची चढ / उतार | १० लाख | 10.05.2024 |

ई निविदा, बयाणा रक्कम ऑनलाईन भरून सर्व तपशीलासह व विहित नमुन्यात सादर करावी.
**ऑफिसचा पत्ता :–** कार्यकारी अभियंता, पोल फॅक्टरी जवळ, लिंक रोड, पंढरपूर, ता. पंढरपूर जि. सोलापूर
PRO / BMTZ / 16 / 2024-25 — कार्यकारी अभियंता, महावितरण (संवसु) विभाग पंढरपूर